दिव्यांग (अपंग) व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्र देण्याबाबत

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः अप्रवि-२०१७/प्र.क्र.१०६/आरोग्य-६

गो.ते. रुग्णालय आवार,
१० मजला, नवीन मंत्रालय, मुंबई -०१
तारीख: १७ ऑक्टोबर, २०१७

**वाचा :-**

१) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकःअप्रवि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२

२) संचालक,आरोग्य सेवा,आरोग्य सेवा संचालनालय यांचे पत्र क्र: संआसे/कक्ष-३/टे-१०/अपंग प्रमाणपत्र/संस्थेतवाढ/ १२९४३-४४/१७ ,दिनांक १४.०८.२०१७

**प्रस्तावना :-**

राज्यातील अपंग व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्र संदर्भाधीन शासन निर्णयानुसार वैद्यकीय मंडळाकडून वितरित करण्यात येतात.सद्यस्थितीत राज्यातील १६ वैद्यकीय महाविद्यालये (शासकीय), ३६ सार्वजनिक आरोग्य विभागाकडील रूग्णालये व मुंबई शहरातील केंद्र शासनाची ऑल इंडीया इन्स्टिटयुट ऑफ फिजिकल मेडिसिन ॲण्ड रिहॅबिलीटेशन हाजी अली, महालक्ष्मी,मुंबई व आलियावर जंग इन्स्टिटयुट कर्णबधिर विकलांग संस्था, बांद्रा अशा एकूण ५४ रूग्णालयांमार्फत अंपग व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्रे देण्यात येतात. राज्यात SADM (Software Assessment of Disability Maharashtra) या संगणक प्रणालीद्वारा अपंगत्व प्रमाणपत्रे दिनांक ०३.१२.२०१२ पासून वितरित करण्यात येत आहेत. राज्यात सुमारे २७ लक्ष अपंग व्यक्ती आहेत. सद्यस्थितीत अपंगत्व प्रमाणपत्र देणाऱ्या संस्थाची संख्या मर्यादीत असल्यामुळे अपंग व्यक्तींना मागणीच्या प्रमाणात अपंगत्व प्रमाणपत्रे वेळेत वितरीत होत नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. तसेच लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था व विविध स्तरामधुन अपंग व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्र विहीत कालावधीत प्राप्त होत नसल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने अपंग व्यक्तींना संगणकीय प्रणालीद्वारे (SADM) अपंगत्व प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळणे शक्य व्हावे, यासाठी अपंगत्व प्रमाणपत्र वितरण करणाऱ्या संस्थाच्या संख्येमध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:

राज्यात SADM (Software Assessment of Disability Maharashtra)या संगणक प्रणालीद्वारा अपंगत्व प्रमाणपत्रे दिनांक ०३.१२.२०१२ पासून वितरित करण्यात येत आहेत. अपंग व्यक्ती (समान संधी) संपुर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण अधिनियम १९९५ नुसार अपंगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठीच्या मार्गदर्शक सुचना संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आल्या आहेत. राज्यात अपंग व्यक्तींना संगणकीय प्रणालीद्वारे अपंगत्व प्रमाणपत्र मिळणे शक्य व्हावे, यासाठी अपंगत्व प्रमाणपत्र वितरण करणाऱ्या संस्थाच्या संख्येमध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने मुंबई,पुणे,नागपूर, पिंपरी चिंचवड, नाशिक,नवी मुंबई व ठाणे या महानगरपालिकांच्या खालील नमुद रुग्णालयांना त्यांच्या कार्यक्षेत्रापुरते अपंगत्व प्रमाणपत्र प्रदान करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

| महानगरपालिका | रुग्णालयाचे नांव |
|---|---|
| **मुंबई महानगरपालिका** | १) के.ई.एम. रूग्णालय, जी.एस.मेडीकल कॉलेज, मुंबई<br>२) लो.टि.स्मृ.वै.महाविद्यालय,सायन हॉस्पीटल, मुंबई<br>३) बा.य.ल.नायर हॉस्पीटल, मुंबई<br>४) कुपर हॉस्पीटल व मेडिकल कॉलेज, मुंबई<br>५) राजेवाडी हॉस्पीटल,घाटकोपर, मुंबई |
| **पुणे महानगरपालिका** | १) कमला नेहरू हॉस्पीटल, पुणे<br>२) डॉ.कोटणीस हॉस्पीटल,गाडीखाना,पुणे |
| **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | १) यशवंतराव चव्हाण हॉस्पीटल, पिंपरी चिंचवड<br>२) तालेरा हॉस्पीटल, पिंपरी चिंचवड |
| **नागपूर महानगरपालिका** | १) इंदीरा गांधी हॉस्पीटल,गांधीनगर, नागपूर<br>२) सीडीआरसी हॉस्पीटल,सदर, नागपूर |
| **नाशिक महानगरपालिका** | १) बिटको रूग्णालय,नाशिक<br>२) डॉ.झाकिर हुसेन हॉस्पीटल, द्वारका, नाशिक |
| **ठाणे महानगरपालिका** | १) छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पीटल,कळवा,ठाणे.<br>२) लोकमान्य हॉस्पीटल, ओरस, ठाणे |
| **नवी मुंबई महानगरपालिका** | जनरल हॉस्पीटल, वाशी, नवी मुंबई |

२. मुंबई महानगरपालिकेकडील १) के.ई.एम.रूग्णालय,जी.एस.मेडीकल कॉलेज, २) लोकमान्य टिळक स्मृ.वै.महाविद्यालय,सायन हॉस्पीटल या २ रूग्णालयांना संपूर्ण महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्र देण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

३. राज्यातील २ शासकीय व सेना दलाच्या १ अशा एकूण खाली नमुद ३ मोठ्या वैद्यकीय महाविद्यालयांना राज्य पातळीवरील सर्व भागातून येणाऱ्या रूग्णांसाठी अपंगत्व प्रमाणपत्र देण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

a. ग्रँट मेडिकल कॉलेज व जे.जे. समुह रुग्णालय, भायखळा, मुंबई
b. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपुर
c. आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज, पुणे

४. राज्यात कोंढवा, पुणे येथे शासनाचे कुष्ठरोगाचे रूग्णालय आहे. या रूग्णालयास कुष्ठरोगामुळे येणाऱ्या अपंगत्वासाठी राज्यस्तरीय प्रमाणपत्र देण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

५. केंद्र सरकारच्या मुंबईतील २ आरोग्य संस्था अनुक्रमे ऑल इंडीया इन्स्टिटयूट ऑफ फिजिकल मेडिसिन ॲण्ड रिहॅबिलीटेशन हाजी अली, महालक्ष्मी, मुंबई व आलियावर जंग इन्स्टिटयूट नॅशनल इन्स्टिटयूट कर्णबधिर विकलांग संस्था, बांद्रा, मुंबई यांना सद्यस्थितीत मुंबई शहर व मुंबई उपनगर हया जिल्हयामधील अपंगत्व प्रमाणपत्रे (अनुक्रमे शाररिक विकलांगता व श्रवण विकलांगता) देण्याचे अधिकार आहेत.सदर संस्था राष्ट्रीय पातळीवरील मान्यता प्राप्त संस्था असल्याने त्यांना संपुर्ण राज्यातील अपंग व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्रे वितरित करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

६. अपंग व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्रे वितरीत करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था निर्माण करुन अपंगत्व प्रमाणपत्रे लवकरात लवकर वितरीत करण्याची दक्षता सर्व सबंधित रुग्णालयांनी घ्यावी.

७. संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या शासन निर्णयामधील **"ग"** येथील अपंग प्रमाणपत्राबाबत तक्रार, अपिल मंडळ व निर्देशी मंडळाच्या रचनेमध्ये सुधारणा करुन त्याची खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **प्रमाणपत्र दिलेल्या संस्थेचे नांव** | **अपील करावयाच्या मंडळाचे नाव** | **अपिलीय मंडळातील सदस्य** |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय संस्था (AIIPMR, AYJNISHD, AFMC) | त्याच संस्थेच्या प्रमुखाचे अध्यक्षतेखालील समिती | १) संस्थचे प्रमुख<br>२) विभाग प्रमुख<br>३) संबंधित विशेषज्ञ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | सर्व शासकीय व महानगरपालिकेची वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये | अधिष्ठाता, जे.जे. समुह रुग्णालय, जी.एम.सी., मुंबई | १) अधिष्ठाता<br>२) वैद्यकीय अधिक्षक<br>३) संबंधित विषयाचे वरिष्ठ प्राध्यापक |
| ३ | सर्व इतर मनपा रुग्णालये व शासकीय जिल्हा/सामान्य/ उपजिल्हा/ अस्थिरोग रुग्णालये/ विभागीय संदर्भ सेवा रुग्णालये / कुष्ठरोग रूग्णालये | संबंधित विभागीय उपसंचालक, आरोग्य सेवा , परिमंडळे | १) उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ<br>२) जिल्हा शल्य चिकित्सक, (अपील करावयाच्या वैद्यकीय मंडळाशी संबंधित नसलेले)<br>३) संबंधित विशेषज्ञ |

८. अपिलीय बोर्डाने अनुज्ञेय असल्यास, पात्र अर्जदारांना अपंगत्व प्रमाणपत्र वितरीत करावे व प्रमाणपत्रावर निर्देशी मंडळाकडुन निर्गमित, असे ठळक अक्षरात नमुद करावे. निर्देशी मंडळाबाबतीत अन्य सुचना / बाबीं दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ च्या शासन निर्णयातील आदेशानुसार कायम राहतील. अपंग व्यक्ती (समान संधी) संपुर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण अधिनियम,१९९५ नुसार अपंगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठीच्या उर्वरित मार्गदर्शक सुचना संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयानुसार लागु राहतील. अपंग व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्र शक्यतो जास्तीत जास्त १ महिन्याच्या कालावधीत वितरित करण्यात यावे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१२१२३६३५०५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Adhikrao Bapu Budhe

Digitally signed by Adhikrao Bapu Budhe
DN: cn=Adhikrao Bapu Budhe, o=Mantralaya, ou=Public Health Department, email=adhikrao.budhe@nic.in, c=IN
Date: 2017.10.17 13:08:53 +05'30'

**(अधिकराव बुधे)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. मंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री, (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री, (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-०१
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-०१
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
आयुक्त,आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान
विभागीय आयुक्त (सर्व)
अतिरीक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
आयुक्त, महानगरपालीका (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
संचालक, वैद्यकिय शिक्षण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई -०१
संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
सहसंचालक/ उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालये (सर्व)
अधिष्ठाता, वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय (सर्व संबंधित रुग्णालये)
सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (आरोग्य-६)